# अमरावती शहर दैनंदीन गुन्हे अहवाल दि ०२/११/२०२३ चे ००.०१ ते १६.०० वा

## घरफोडी

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय संपर्क क्र | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | भातकुली 216/23 कलम 457,380 भादवी | भातकुली | दि 01-11-23 चे 21.15वा ते दि. 02.11.23 चे 07.00 वा. दरम्याण दि. 02.11.23 चे 09.35 वा | गजानन श्रावण डगवाळे वय- 49 वर्ष रा- तहसिल कार्यालय समोर भातकुली | अज्ञात | हकिकत अशा प्रकारे आहे कि दि. 01.11.23 रोजी दिवस भरदुकान चालवुन अंदाडे 09.15 वा दुकान बंद केले. तेव्हा दुकानातील गल्ल्यात अंदाजे 50,000/- रु होते. रात्री जेवन केल्यानंतर झोपी गेलो आज दि. 02.00.23 रोजी सकाळी 07.00 वा च सुमारास झोपीतुन उठवुन लहाण भाउ नारायण डगवाळे याने मला सांगितले कि दुकानातील दारांचे आत मधिल कुलुप कोंडा कोणीतरि तोडला असुन दार उघडे आहे. वरुन मी दुकानात जावुन पाहणी केली असता दुकामातील सर्व सामान व्यवस्थित असुन पैश्याच्या गल्ल्याचे कुलुप तुटलेले दिसले. व त्यातीसअंदाजे 50,000/- रु कोणीतरि अज्ञात चोराने तोरुन नेल्याचे दिसले वरुन पोलिस स्टेशनला रिपोर्ट देत आहे. असा फि चे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## चोरी

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय संपर्क क्र | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो स्टे गाडगे नगर अमरावती<br>अप क्र १३३१/२३ कलम ३७९ भादवि | विद्याभारती महाविद्यालय अमरावती | दि ०२-११-२३ चे सकाळी ०७-३० वा दरम्यान<br>दि ०२-११-२३ चे १४-३४ वा | संजय मनोहरराव माळवी वय ५१ वर्षे रा किरण नगर गल्ली न २ अमरावती | अज्ञात इसम | यातील नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील फि यांचा मुलगदा नामे आर्यन वय १६ वर्षे हा विद्याभारती महाविद्यालय अमरावती येथे ११ वि मधअये शिकत आहे त्याचे पेपर चालु असल्याने त्याने पेपर ला जातांना बँग वर्गाचेबाहेर ठेवली पेपर संपल्यानंतर बँग ताब्यात घेतला असता बँग मध्ये मोबाईल दिसुन आला नाही सदर मोबाईल हा रियल मि ११ प्रो प्लस ५ जि (८अधिक २५६) अँनरॉईड मोबाइल कि अं २५०००/-रु चा घेतला होता .त्याचा आयएमइआय क्र ८६४७२००६५१८१७२./८६४७२००६५१८१७८४ त्याची अंदाजे आज चटी किमंत १५०००/-रु चा दिसुन आला नाही कुणीतरी अज्ञात इसमाने तो मोबाईल पेपर चालु असतांना वर्गाच्या बाहेर ठेवलेल्या बँगमधुन चोरुन नेला.अश्या फि चे जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## विश्वासघात

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय संपर्क क्र | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो स्टे गाडगे नगर अमरावती<br>अप क्र १३३०/२३ कलम ६६ डि आय टी अँक्ट प्रमाणे | जाई रेसिडेन्सी फ्लँट क्र.४०१ महर्षी कॉलनी टावर लाईन अमरावती | दि २६-१०-२३ चे १९-५३ वा दरम्यान<br>दि ०१-११-२३ चे ११-५७ वा | अनुप ज्ञानेश्वर तुळसकर वय ३३ वर्षे रा जाई रेसिडेन्सी फ्लँट क्र.४०१ महर्षी कॉलनी टावर लाईन अमरावती | मोबाइल धारक | यातील नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील फि यांना फेसबुक वरुन फ्रेंड रिक्वेस्ट आली अंकीत कटारीया लंडन येथे आहे म्हणुन फि यांनी फ्रेंड रिव्वेस्ट स्विकारली .त्यानंतर फि यांची त्याचेशी चंटींग झाली.सदर इसमाला पैशाची आवश्कता आहे असे सांगीतले त्यावर फि यांनी यांनी म्हटले कि पैसे कशावर पाठवु तर त्यांनी गुगल पे नंबर पाठविला व पुन्हा फि यांना रिक्वेस्ट आली कि पुन्हा १५००० रु पाठवा त्यावर फि यांनी अंकीत ला सांगीतले कि त्यावर अंकीत यांनी सांगीतले कि फेसबुकवर कुणीतरी फेक अकाउट ओपनकेले आहे .व सायबर ला तक्रार दे करीता फि यांनी पो स्टे ला येवुन तक्रार दिली अश्या फि चे जबाणी रिपोर्ट वरुन सदर चा गुन्हा दाखल |

## अपघात

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय संपर्क क्र | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|

| | कलम | | माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोस्टे राजापेठ अप क्रं. ९४३/२३ कलम २७९, ३३७ भादवीं | अमरावती | घटना ता. वेळी दि. ०१/११/२०२३ चे १८.३० वा. दरम्यान दा. ता. वेळ ०२/११/२३ चे ००/०८ वा. | एक महीला | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादी घरी परत येण्याकरिता घरकुल मसाला कंपनी समोरील रोड क्रॉस करीत असतांना अमरावती कडुन बडनेरा कडे जाण-या अज्ञात टुव्हीलर चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवुन फिर्यादीस धडक मारुन जखमी केले. अशा फिर्यादी जबानी रिपोर्ट वरुण डीओ आदेशाने सदरचा गुन्हा दाखल |

## इतर

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय संपर्क क्र | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो.स्टे नागपुरीगेट अमरावती अप क्५६०/२३ कलम २८३ भादवी | चांदणी चौक छत्रपुरी खीडकी अमरावती | दि ०२/११/२३ चे ११/०० वा ते ११/३० वा.दरम्याण दाखल दि.०२/११/२०२३ चे १२/३७ वा | पोउपनि गजानन विधाते पो.स्टे.नागपुरीगेट अमरावती | राजेद् नामदेव बोरकर वय ५२ रा बिल्डी ता फु ुलबी जि. औरंगाबाद | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे े पो.स्टे हद्दीत पट्रोलींग करित असतांना यातील आरोपी नामे आपले ताब्ययातील वाहण क् एम.एच.२०ई.एल.९२०७ ट्रक सार्वजनिक ठिकाणी आमरोडवर धोकादायक स्थीतीत लोकांच्या जिवीताश धोका निर्माण होईल अशा रितीने आमरोडवर उभा केल्याने सदर आरोपीचे हे ेकृत्य कलम २८३ भादवी प्रमाने होत असल्याने सदरचा गुन्हा दाखल |
| २ | पोस्टे राजापेठ अप क्रं. ९४४/२० | सामरा नगर गल्ली नं. १ अमरावती | घटना ता. वेळी दि. ०२/११/२०२३ चे ०१.३० वा. | सरतर्फे पोहेका सागर सरदार ब.नं. १५८ पोस्टे राजापेठ | हेमंत श्रीराजपाल कपुर वय ३२ वर्षे रा. ग्राम ३०-४० डबोली फस्ट गोविंद नगर कानपुर | हकीकत अशा प्रकारे आहे की दि. ०१/११/२०२३ रोजी २३.०० वा. ते दि. ०२/०७/२०२३ चे ०९.०० वा. सोबत स्टाफ पोहेका/३२३, २६ पोना/१३६२ पोशि/२२३ असे शहरात गुन्हेगार चेक रात्र गस्त पेटोलिंग करीत असतांना ०१.१५ वा. सामरा नगर गल्ली नं. ०१ येथे एक ईसम आपले अस्तीत्व लपउन दखलपात्र स्वरुपाचा गुन्हा करण्याचे इरादाने निदर्शनास आला त्याला आवाज दिला असता त्याने तेथुन पळ काढण्याचा प्रयत्न केला असता त्याला पोस्टाफ चे मदतीने ताब्यात घेवुन त्याचे |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २३ कलम १२२ मपोका | | दा. ता. वेळ ०२/११/२३ चे ०२/१९ वा. | अमरावती शहर | उत्तर प्रदेश | नाव पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव हेमंत श्रीराजपाल कपुर वय ३२ वर्ष रा. ग्राम ३०-४० डबोली फस्ट गोविंद नगर कानपुर उत्तर प्रदेश असे सांगितले सदर ईसमास त्या ठिकाणी येण्याचे कारण विचारले असता त्याने समाधानकारक उत्तर दिले नाही. सदर आरोपी हा सुर्यास्तानंतर व सुर्यादयापुर्वी आपले अस्तित्व लपवुन दखलपात्र स्वरुपाचा गुन्हा करण्याच्या उददेशाने मिहुन आला आहे. तरी सदर आरोपी विरुदध गुन्हा नोंद |
| ३ | पो ठाणे सिटी कोतवाली अप क्र.४९७/२३ कलम ४,२५, आर्म ॲक्ट, १३५ मपोकॉ | जयस्तंभ चौक, अमरावती | घटणा ता वेळ दि.०१.११.२०२३ चे २०.३० वा<br><br>दाखल ता वेळ दि.०२.११.२०२३ चे ००.१४ वा | पोउपनि रवि सा झाकर्डे वय ३१ वर्ष व्यवसाय नोकरी, पो. स्टे सिटी कोतवाली अमरावती | रतन वसंतराव उके, वय ४३ वर्ष, रा, राजमाता नगर, अमरावती | हकिकत अशा प्रकारे आङे की, लेखी रिपोर्ट पो स्टे ,सिटी कोतवाली अम. शहर दि. ०१.११.०२३ प्रती , मा. वपोनि सा पो, सेटे सीटी कोतवाली अम शहर रिपोर्ट देणार पोउपनि रवि सा झाकर्डे वय ३१ वर्ष व्यवसाय नोकरी, पो. स्टे सिटी कोतवाली अमरावती , आरोपी रतन वसंतराव उके, वय ४३ वर्ष, रा, राजमाता नगर, अमरावती याचेवर कलम ४,२५, आर्म ॲक्ट, १३५ मपोकॉ अन्वये महोदय सविनय सेवेसी सादर आहे की, मी पो. स्टे सिटी कोतवाली अमरावती शहर येथे नेमनुकीस असुन पोअपनि म्हनुन काम करतो आज दि. ०१.११.०२३ रोजी आमची १४.०० वा ते २१.०० वा पावेतो डिओ डियुटी असतांना अंदाजे २०.३० वा. च्या सुनारास नागरीकांच्या कडुन माहीती मिळाली की जयस्तंभ चौक , येथे एक इसम हातात चाकु घेवुन तेथील लोकांमधे दहशत पसरवित असुन लोक त्याला मारहान करीत आहे वरुन आम्ही सोबत पोकॉ २३९ असो जयस्तंभ चौक येथे आलो असता तिथे काही लोकांची गर्दि दिसुन आली न गर्दितील काही लोक पो.सेटे चे रेकॉड वरील आरोपी नामे रतन वसंतराव उके, वय ४३ वर्ष, रा, राजमाता नगर, अमरावती याला मारहान करीत होते वरुन आम्ही त्यास ताब्यात घेवुन त्याची अंगझडती घेवुन त्याचे ताब्यातुन एक लोखंडी धारदार चाकु जप्त करण्यात आले. सदर आरोपीला लोकांनी मारहाण केल्याने त्यास पो. स्टे चे मदतीने जि. सा. रु अम येथे वैद्यकीय तपासणी करीता पाठविण्यात आले. तरी सदर आरोपीची अंगझडतीमध्ये ताब्यातुन एक लोखंडी पाते असलेला धारदार चाकु मिळुन आला. तो पंचसमक्ष जप्ती पंचनाम्याप्रमाणे जप्त करणॅ्यात आला . सदर आरोपी विरुद्ध पो, स्टे ला गंभीर स्वरुपाचे शरीराविरुद्धाचे गुन्हे दाखल असुन तो नेहमी शस्त्र बाळगण्याच्या सवयीचा आहे. त्यांनी मा. पो. आयु. सा. यांचे मपोका ३७(१) अन्वये अधिसुचना व कलमा ३७(३) अन्वये लागु असलेल्या आदेशान्वये लागु असलेल्या आदेशाचे उल्लंधन करतांना मिळुन आले. वरून सदर आरोपीचे कृत्य हे कलम ४,२५ आर्म अक्ट व सह कलम १३५ मपोका होत असल्याचे त्याचे वर कार्यवाही करणे करीता माझी आरोपी विरूध्द कायदेशीर फिर्याद आहे. |

## दिनांक १६/०४/२०२३रोजीचा दैनिक गुन्हे अहवाल प्रोव्हीशन) अमरावती शहर

| अ.क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा अमरावती शहर | ९२७/२०२३ कलम ६५ ई म.दा.का. | अमरावती | दि ०२/११/२०२३ चे ११/३० वा. | दि ०२/११/२०२३ चे १३/३९ वा. | सरतर्फे पोहेकॉ सुनील सोळंके ब नं २८९ पो स्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर | एक महीला | हकिकत अशा प्रकारे आहे कि यातील फिर्यादी हे पो स्टाफ सह पो स्टे हददीत पेट्रोलींग करीत असतांना मिळालेल्या गुप्त माहीतीचे आधारे नमुद आरोपीवर पंचांसमक्ष प्रो रेड केली असता नमुद आरोपी ही विनापरवाना अवैधरित्या दारुची विक्री करतांना मिळुन आला नमुद महिला आरोपीचे कब्जातुन पंचांसमक्ष ा टॅंगो देशी दारूच्या ९० मीलीच्या १२ नग अंदाजे एकुण किं ४२०/— रू.चा मुददेमाल जप्त करण्यात आला नमुद महीला आरोपीचे हे कृत्य कलम ६५ ई मदाका प्रमाणे होत असल्याने फियादीचे लेखी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल<br>अमरावती शहर |